
# सुस्वागतम्





# No Transfusion of Idea
# Only transformation


स्वामी चिन्मयानंदांचे शैक्षणिक विचार

राज्यस्तरीय चर्चासत्र

दि. ३–४–५ मार्च २०११


बालकांबाबत दृष्टिकोन :–:–






‘‘वर्तमान काळात थोडा कालावधी मिसळला की भविष्यकाळ बनतो. वर्तमान अधिक थोडा काळ म्हणजेच भविष्यकाळ. म्हणून आपले वर्तमान कार्य आणि या अधिकच्या काळातील सामुदायिक कार्य या सर्वांचे फलितच आपले भविष्यातले जग ठरवीत असते.






“ म्हणून साहजिकच आजच्या मुलांचे दृष्टिकोन, जीवन मूल्ये, त्यांच्या कल्पना, ध्येयकेंद्रे आणि आदर्श यांना उत्तम आकार व घडण दिली तर आपल्या सध्याच्या अपेक्षानुसार जग अधिक चांगले, सुसंघटित व आदर्श असे जग निर्माण होईल अशी निश्चित अपेक्षा करु शकतो.






“ आजची मुले हेच आपले भवितव्य आहे. हे जाणून आताच कसून प्रयत्न केले पाहिजेत. जीवन घडविणे म्हणजे अचूक विचार करणे, उतम निर्णय घेणे आणि घेतलेल निर्णय धीरोदात्तपणे जीवनात उतरवणे होय. यासाठी मुलांना योग्य बनविले पाहिजे.






“ आजच्या भारताच्या या दुःखद स्थितीचे म्हणजे माझ्या भोवतालच्या माणसांच्या व्यक्तिमत्वाच्या ढासळलेल्या पोताचे अवलोकन करतांना, भूतकाळात त्यांच्या बालपणी त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले असावे असे मला दिसते.






आपले इतके अध:पतन कसे काय झाले आहे? आजच्या पिढीच्या बाल्यावस्थेत संस्कार करण्याच्या दृष्टीने आपण दुर्लक्ष केले हेच त्याचे कारण नाही काय? भूतकाळातील ते दुर्लक्ष आणि निष्काळजीपणाची पडछायाच परिणामत: आज दिसून येत आहे आणि त्यामुळे आजची परिस्थिती रुपहीन व कुरुप दिसत आहे.






आजची मुले चुणचुणीत असतात. आकलन शक्ती अधिक असते. वर्तमान युगातील गतीमान जीवनाशी लढा देण्यासाठी त्यांनी स्वत:मध्ये खूप वैशिष्ट्ये विकसित केली आहेत.






सभोवतालच्या ह्या नवीन जगाशी जुळवून घेता यावे म्हणून निसर्गानेच प्रामाणिकपणे त्यांच्यात एक प्रकारची क्षमता विकसित केली. अशाप्रकारे त्यांच्या या मानसिक घडणीमुळे व बौध्दिक क्षमतेमुळे ती काहीशी वेगळीच वाटतात.






“आज सभोवताली मुलांना कमालीचा स्वार्थ दिसत आहे. खुल्या स्पर्धा नजरेस पडत आहे. आत्मसंयमनाचे आणि त्यागाचे जीवन कोणी जगत आहे. हे त्यांच्या दृष्टीस कधी पडत नाही. पालकांच्या दृष्टिकोनातूनच व पवित्र असे काहीच नसते.






“‘मागील शतकात त्यांच्यावर लादल्या गेलेल्या शिक्षणपध्दती त्यांना हळुहळु चिरडून टाकू लागल्या आहेत आणि त्यातूनच निर्माण होत आहेत. क्रूरप विचित्र व्यंगचित्रे






जगण्यासाठी शिक्षणाच्या काही नवीन पध्दती निर्माण करण्याची आज गरज आहे





If the future is to be bright we have to mould our children to think in a new patterns and with a new vision. It is not revolution but it is evolution of each individual character".





ह्यासाठी पालकांनी बदलण्याची आवश्यकता आहे,


`. कारण विद्यार्थी पुस्तकातून अध्ययन करु शकत नाही.

ही मूल्ये संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजविता येणार नाही

तर मुले आपल्या पालकांचे अनुकरण करतात.


ह्या कार्यात आईची भूमिका गुरुदेवांनी अत्यंत महत्वाची मानली आहे.






लहान रोपट्याची योग्य काळजी घेतली तरच त्याचे रुपांतर सरळ वृक्षात होते. ह्यासाठी झाड लहान हवे व माळी हा प्रामाणिक हवा.






वय वर्ष ६ ते १२ ह्या काळात आपण बालकांना योग्य मूल्य संस्कार देऊ शकतो. त्यानंतर मात्र देऊ शकत नाही. त्यानंतर त्यांच्या विचारांना आपण बदलवू शकत नाही आणि म्हणूनच बाल्यावस्था ही संस्काराकरिता महत्वाची अवस्था






माता ही सेवेचा आदर्श आहे. **Mother lives the Ideals of charity goodness, tenderness, affecion and forgiveness.** माता आपल्या जीवनात वरील आदर्शाचे दिग्दर्शन करीत असते. बालक ह्या बाबीचे निरीक्षण करते व अनुकरण करते.






We have to take responsibility for moulding and beautifying our children, prepare them to face the world tommorrow and to lead and guide the world of the future".






नर्सरी अवस्थेत बाल्याला आनंदी वातावरण व आदर्श प्रेम पुरवायला हवे. जे चांगले आहे त्याची स्विकृती जे आदर्श आहे त्याला स्विकृती, सौंदर्याची ओळख, मानवातील आनंदीभाव हे आदर्श गुणधर्म दिग्दर्शन करायला हवे. ह्या वयात अमूर्ताबाबतची ग्रहण क्षमता कमी असते. पण ह्यावेळी आदर्शाची अभिव्यक्ती दिग्दर्शित व्हायला हवी.





त्यांना तुम्ही त्यांच्यावर प्रेम करता हे त्यांना सांगा. ते सुंदर आहेत हे त्यांना सांगा ते हुशार आहेत, आदर्श आहेत हे त्यांना सांगा त्यांना वारंवार सांगा. तुमच्या इतरांसाठी त्याग करण्याच्या वृत्तीचे दिग्दर्शन करा. मुलांना हे कळू द्या की तुम्ही इतरांच्यामदतीसाठी उत्सुक आहात






ह्या काळातील मुलांना अध्यापन हे २४ तास ३६५ दिवस असावे.



मूल ५ वर्षांचे झाल्यावर ते शाळेत जायला समर्थ बनते. ह्यावेळी त्यांचे शारीरिक अवयवात सामर्थ्य आले असते.



ह्याच वयात त्यांच्या वर्तनाला योग्य वळण देण्याचा प्रयत्न आपण करायला हवा.

कला व हस्तकलांचे वर्ग हे वर्तनाला आकार देण्याकरिता अतिशय उपयुक्त आहेत.


त्यांच्याशी प्रेमानेच वागावे.

अतिरेकी परिस्थितीत सर्व मुलांच्या उपस्थितीत त्यांना शासन करावयास हरकत नाही.


त्यांच्य सुरक्षेशी व त्यांच्या सुखाशी तुमच नित्य संबंध आहे हे त्याला अभिव्यक्त करायल



वय वर्ष ५ ते १० :–




त्याला उच्च आदर्शांचे धडे देणे महत्वाचे ठरते. हे गोष्टीच्या माध्यमातून घडेल. ह्या गोष्टीतून तो आपले आदर्श उचलेल, पौराणिक कथा, संतांच्या कथा, वैज्ञानिकांच्या, राजकारणी लोकांच्या, समाज सेवकांच्या कथा सांगणे योग्य ठरेल. पंचतंत्राच्या गोष्टी सांगणे योग्य ठरेल. ह्या कथांच्या माध्यमातून हे **"They will learn how in the confrontation of the good and the evil. The good alone wins in the end. Recitation, Mass-chanting, group song"**. ह्या वयाकरिता योग्य आहेत.



वय वर्ष १० ते १४ :–

बालकाच्या या वयातील गरज सांगतांना गुरुदेव म्हणतात, **"They need a little more material to handle as their minds have unfolded to an extend".** ह्यामुळे त्यांना अध्ययनात अधिक रुची निर्माण होईल आणि जीवनाचा मार्ग व दिशा ह्याबाबत त्यांना आकलन होईल. ह्या वयोगटात गुरुदेवांनी काही पुस्तके सुचित केली आहेत. ती म्हणजे **Geeta for Children I Love You.**






वय वर्ष १५ ते १८ :–

ह्या वयात त्यांच्या कल्पना त्यांच्या शब्दात अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. त्यांनी ज्याचे वाचन केले आहे त्यातील कल्पना अभिव्यक्त करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करायला हवे. त्यांच्या लाजाळूपणा ह्याचा त्यांच्या व्यक्तिमत्वातून विवरा झाला पाहिजे. त्यांना प्रोत्साहित करा. ह्या वयात त्यांच्या चूकांबाबत टिका करु नये त्यांना वृध्दींगत होण्यासाठी सहाय्य करायला हवे. **Leave them alone to grow up do not hasten them.**




वय वर्ष १५ ते १८ :–

ह्या वयात त्यांच्या कल्पना त्यांच्या शब्दात अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. त्यांनी ज्याचे वाचन केले आहे त्यातील कल्पना अभिव्यक्त करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करायला हवे. त्यांना प्रोत्साहित करा. ह्या वयात त्यांच्या चूकांबाबत टिका करु नये त्यांना वृध्दींगत होण्यासाठी सहाय्य करायला हवे. **Leave them alone to grow up do not hasten them.**








वय वर्ष १८ ते २० :–

ह्या वयात बालक शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून परिपक्व झालेले असते. अशावेळी त्यांना साधनेतील प्रारंभिक पायऱ्या समजून सांगायला हव्यात.






वय वर्ष १८ ते २० :–

याची आवश्यकता वर्णन करतांना गुरुदेव म्हणतात, **"They can all by themselves come to discover that they can with diligence and practice control the mand on rush of their own wild and crazy mind."**






वय वर्ष १८ ते २० :–

ह्यासाठी थोड्या वेळाचा जप व अंतर्मनातील शांती अनुभवण्याचा सराव त्यांना द्यायला हवा. ह्यातून मुलांच्या मनात निष्ठा उत्पन्न व्हायला हवी की, **"Man needs, self control if he is to control his own mind."** मनाला अशा प्रकारे वळविल्या शिवाय त्यांच्या जीवनात सौंदर्य येणार नाही.ण






वय वर्ष २० ते २५ वर्ष :–

हा तरुण वयाचा कालखंड.

ह्या वयात आपण त्यांना उच्चावस्थेकडे जाण्यास प्रवृत्त करायला हवे. ह्यासाठी,


**"Without any hasitation teach them the upanishands (Is a Kena and Kothopnishad) and Geeta (Chapter (II, III, VI, IX, XII, XIII)** आणि त्यांना वृध्दींगत होण्याची संधी द्या.






अशी आदर्श शिक्षण व्यवस्था आपण तयार करु शकतो का?






मुलांच्या बालकाच्या वाढ व विकासात गुरुदेवांना शाळेतील वातावरण व घरातील वातावरण ह्यावर भर दिला आहे. शिवाय ह्या करिता सर्व बालकांना एकत्र आणून त्यांच्यात सांस्कृतीक आंतरक्रियेवर त्यांनी विशेष भर






आजची मुले बालके ही उद्याचे भविष्य आहे
आणि म्हणूनच वर्तमान बालकांना सुंदर
स्वभाव निर्मितीवर गुरुदेवांनी भर दिला आह





आपली बालके हे आपले भविष्य आहे, हे आपण मान्य करतो पण त्यासाठी काय करायला हवे ह्यासाठी आपल्याकडे निश्चित अशी योजना नाही. केवळ पाठ्यपुस्तकात परिवर्तन करून चालणार नाही. वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनवर मूल्याधारीत शिक्षणाची घोषणा करून चालणार नाही तर सर्वात पहीला उपाय ते सांगतात की, पालकांनीच बदलायला हवे. असे सांगत असतांना त्यांनी पालक शिक्षणाचाही पाया रोवला





आपली बालके हे आपले भविष्य आहे, हे आपण मान्य करतो पण त्यासाठी काय करायला हवे ह्यासाठी आपल्याकडे निश्चित अशी योजना नाही. केवळ पाठ्यपुस्तकात परिवर्तन करून चालणार नाही. वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनवर मूल्याधारीत शिक्षणाची घोषणा करून चालणार नाही तर सर्वात पहीला उपाय ते सांगतात की, पालकांनीच बदलायला हवे. असे सांगत असतांना त्यांनी पालक शिक्षणाचाही पाया रोवला





# धन्यवाद !

